**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**

**मा.विधी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक-१**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ०६.०७.२०१० वेळ- सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) मंगळवार दिनांक ०६.०७.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.आर.के.गायकवाड- अप्पर जिल्हाधिकारी, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.रामआधार धारिया
२. मा.काळुराम मारूती पवार
३. मा.उबाळे वैशाली संजय
४. मा.भारती ज्योती सुखलाल
५. मा.घुले रघुनंदन रामभाऊ

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मी आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे याठिकाणी सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत विधी समितीच्या सभापतींची नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे विधी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

**मा.नगरसचिव-** विषय क्रमांक १ - मा.विधी समितीच्या सभापतींची नेमणुक करणे. मा.विधी समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | काळूराम मारूती पवार | उबाळे वैशाली संजय | धराडे शकुंतला भाऊसाहेब |
| २) | काळूराम मारूती पवार | ॲड.अमर साधुराम मुलचंदानी | भारती ज्योती सुखलाल |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त दोन नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मा.विधी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ती नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.विधी समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.काळुराम मारुती पवार हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती सभापती पदासाठी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत त्यामध्ये मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.काळूराम मारूती पवार हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.काळूराम मारूती पवार** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-

**( आर.के.गायकवाड )**

अप्पर जिल्हाधिकारी- पुणे

पिठासीन अधिकारी

विधी समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती मा.काळूराम मारुती पवार यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक २-मा.विधी समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे. मा.विधी समितीचे उपसभापती पदावर नेमणुक करणेकामी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|
| १) भारती ज्योती सुखलाल | काळूराम मारूती पवार | ॲड.अमर साधूराम मुलचंदानी |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांच्याकडे सुपूर्द केले. मा.सभापती यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.सभापती**- मा.विधी समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ते नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. त्यामध्ये उपसभापती, मा.विधी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे.

१) भारती ज्योती सुखलाल

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २
दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती उपसभापती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले असुन वैध ठरलेले असल्याने मा.विधी समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.भारती ज्योती सुखलाल हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.भारती ज्योती सुखलाल यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा विधी समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
( काळुराम मारूती पवार)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०६.०७.२०१०

सूचक :- मा.रामआधार धारिया अनुमोदक :-मा.रघुनंदन घुले

मा.विधी समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी दुपारी २.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(काळूराम मारूती पवार)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/९७२ /१०
दिनांक- ०६/०७/२०१० चे लगत

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.